**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७९/२०१९** **दिनांक ०१/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**

| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २५/०९/२०१९ ते ०१/१०/२०१९)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०२/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून ०६/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२५/०९** | **२६/०९** | **२७/०९** | **२८/०९** | **२९/०९** | **३०/०९** | **०१/१०** | | **०२/१०** | **०३/१०** | **०४/१०** | **०५/१०** | **०६/१०** |
| ३२.६ | ०.० | १९.० | ३.४ | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ३५ |
| ३०.६ | २९.८ | २९.० | २९.० | २९.० | ३०.२ | ३०.२ | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३३ | ३४ | ३४ |
| २३.२ | २४.० | २३.५ | २४.० | २३.५ | २२.५ | २३.४ | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २४ | २५ | २५ |
| ८ | ४ | ६ | ४ | २ | २ | ४ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ७ | ६ | ३ | ५ |
| ९८ | ८८ | १०० | ९८ | ८८ | ९० | ९० | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९५ | ९५ | ९५ | ९६ | ९४ |
| ८३ | ९८ | ८० | ८५ | ८६ | ८१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६८ | ६९ | ६६ | ६४ | ६८ |
| १.८ | १.४ | २.५ | २.५ | २.४ | २.४ | १.७ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| शांत | प. | प. | उ. | प. | प. | शांत | **वाऱ्याची दिशा** | आ. | ई..पू. | ई..पू. | ई. | आ. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **५५.०** | **४९६४.३** | **३०७१.८** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ६ ऑक्टोबर,२०१९ रोजी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून दिनांक २ ते ६ ऑक्टोबर,२०१९ पर्यंत कमाल तापमानात वाद संभवते तसेच आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक ४ ते १० ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्य राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **भात** | **फुलोरा ते दाणे भरणे अवस्था** | • पुढील चार दिवस पाऊसाची उघडीप असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस "वैभव" विळ्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे..<br>• पाऊसाची उघडीप असल्याने आणि निमगरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत व गरवे भात फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी.<br>• गरव्या भात पिकास नत्र खताची तिसरी मात्रा ७१ किलो युरिया प्रति हेक्टरी पिक फुलोऱ्यात असताना देण्यात यावी.<br>• पाउसाची उघडीप व ढगाळ वातावरणामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने खाचरात पाणी जास्त काळ न साठता २-३ दिवसांच्या अंतराने फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.<br>• पाउसाची उघडीप असून ढगाळ वातावरण असण्याची शक्यता असल्यामुळे पाणी साचून राहणाऱ्या तसेच घन लागवड आणि नत्र खताची अवाजवी मात्रा दिलेल्या भात खाचरात तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पिकाचे तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भावावर सातत्याने लक्ष ठेवावे. जर रोपाच्या चुडात ५ ते १० तुडतुडे आढळल्यास ॲसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी २.२५ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ०.२ मि.ली प्रति लिटर पाण्यातून भात पिकावर फवारावे. तसेच खाचरात पाणी जास्त काळ न साठता फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. टिप : फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी.<br>• पाऊसाची उघडीप, वाढते ऊन व आर्द्रतेचे प्रमाण यामुळे वरकस आणि उतार असलेल्या जमिनीतील हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पिकाचे चांगले निरीक्षण करावे. ज्या विभागामध्ये प्रादुर्भाव आढळून येत आहे, त्या ठिकाणी भातखाचरात एकरी तीन ते चार पक्षी बसण्याचे थांबे उभे करावेत. जेणेकरून पक्षी या अळ्या नष्ट करतील. तसेच सकाळी किंवा सायंकाळी भातखाचरात जाऊन चूड उघडून पाहावेत. त्यामध्ये अळी/कोष प्रतिचुड १ याप्रमाणे आढळल्यास डायक्लोरव्हॉस ७६ डब्लू.एस.सी. १३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून सायंकाळी किंवा सकाळी लवकर वारा शांत असताना फवारावे. **टिप :** फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी |
| **आंबा** | **पालवी** | • जास्त हवामान आर्द्रतेच्या काळात जास्त पालवी असलेल्या झाडांवर बुरशीची वाढ झालेली असते. सद्यस्थितीतील वाढणाऱ्या तापमानामुळे सदर बुरशीची वाढ जोमाने होऊन फांदी मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के |

| | | |
|---|---|---|
| | | प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • जास्त हवामान आर्द्रतेच्या काळात जास्त पालवी असलेल्या झाडांवर बुरशीची वाढ झालेली असल्याने तसेच सद्यस्थितीतील वाढणाऱ्या तापमानामुळे सदर बुरशीची वाढ जोमाने होऊन फांदी मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने गोळा करून नष्ट करावीत, रोगट फांद्या कापून काढाव्यात कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावीत. अशा प्रकारे बागेची स्वच्छता केल्यावर मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि. ली. प्रती लिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • प्राप्त पुर्वानुमानानुसार तापमानात वाढ संभवत असून तसेच सद्यस्थितीत पाऊसाने उघडीप दिल्याने सुपारी बागेला पाण्याचा ताण बसण्याची शक्यता आहे त्यामुळे सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. जर ८-१५ दिवसांच्या उघडीपनंतर पाऊस पडल्यास अशा प्रकारे ताण बसलेल्या बागेत फळे फुटून गळण्याची शक्यता असते. |
| **भाजीपाला पिके** | **फळधारणा** | • भेंडी पिकामध्ये वाढत्या तापमानामुळे हळद्या रोगाचा प्रादुर्भावाची शक्यता असल्याने, प्रादुर्भाव दिसून आल्यास रोगग्रस्त रोपे उपटून टाकावीत. डायमेथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या रंगाची चिकट कार्ड ठेवावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | -- | • शेळ्यांना घटसर्प रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>• फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. यासाठी प्रत्येकी १०० किलो बारीक तुकडे केलेल्या गवतावर ५ ते ६ लिटर पाण्यामध्ये तयार केलेले द्रावण (२ कि. गूळ + अर्धा कि. युरिया + १ कि. मीठ) शिपडावे. प्रक्रिया केलेल्या गवताचे थर रचून बाजारात सहज उपलब्ध असलेल्या प्लास्टिक सायलो पूर्ण भरावेत. पाउस आणि उष्णते पासून संरक्षणासाठी सायलो शेड मध्ये ठेवावेत. अशा पद्धतीने २-३ महिन्यामध्ये मुरघास जनावरांना खाण्यासाठी तयार होतो. |
| **कुकुटपालन** | | • कोंबड्यावरील राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>• पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**